



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






वर्ष २९ वे | अंक २१६ | पाने ४ | मंगळवार | दि. १६ सप्टेंबर २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# देवाभाऊ,आजूबाजूला काय घडते पाहा

## शरद पवार:..तर आम्हाला बघ्याची भूमिका घेता येणार नाही



**नाशिक/वृत्तसंस्था:-**

देवाभाऊ तुम्ही सर्व महाराष्ट्रात तुमचे फोटो लावले. छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेत असल्याचे तुम्ही देशाला दाखवले. मात्र, देवाभाऊ शेतकऱ्यांकडे पाहायला तयार नाहीत. देवाभाऊंना माझी विनंती आहे की जरा आजूबाजूला पाहा. काय घडतेय? आम्ही सत्तेचा गैरवापर करत नाहीत. पण सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत असेल तर आम्हाला बघ्याची भूमिका घेता येणार नाही, असा इशारा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने नाशिक येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाला शरद पवार यांनी संबोधित केले. देवाभाऊ शिवाजी महाराज यांच्या काळात दुष्काळ पडला होता, त्यावेळी त्यांनी सोन्याची नाणी दिली आणि सोन्याचा नांगर शेतकऱ्यांना घेता आला, ते शेती करू शकले. आज शिवाजी महाराज यांचे नाव घेत आहात आणि बळीराजाकडे ढुंकून पाहत नाही. आपल्याला बघ्याची भूमिका घेता येणार नाही. आगामी ठराविक दिवसांत मदत केली नाही तर नाशिकचा हा मोर्चा भविष्यात आणखी उग्र रूप घेईल. देवाभाऊ देशाच्या आजूबाजूला बघा काय घडत आहे. नेपाळमध्ये काय घडत आहे, ते पाहा. तेथील राज्यकर्ते गेले आणि त्या ठिकाणी एक भगिनी आली आणि तिच्या हातात तेथील सत्ता देण्यात आली. आणखी काही मी बोलणार नाही, असा सूचक इशाराही शरद पवार यांनी दिला.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात गेल्या दोन महिन्यांत दोन हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी जीव का देतो? शेतकरी एवढी टोकाची भूमिका का घेतो? याचं कारण शेतकऱ्यांच्या संटकाच्या काळात मार्ग काढण्याची जबाबदारी सरकार घेत नाही, या शब्दांत शरद पवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला. तसेच सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले नाहीत, शेतकऱ्यांना मदत केली नाही तर आज नाशिकचा हा मोर्चा फक्त सुरूवात आहे. ही सुरूवात येथेच थांबणार नाही. महाराष्ट्राच्या जवळपास सर्व जिल्ह्यात या वर्षी अतिवृष्टी झाली आहे. याचा परिणाम शेकऱ्यांवर झाला आहे. संकट येत असतात. त्यावर मार्ग काढायचा असतो. ही जबाबदारी राज्य सरकार आणि केंद्र सरकारची असते. मात्र, आपण आज पाहतो की शेतकऱ्यांकडे पाहायला आजच्या राज्यकर्त्यांना वेळ नाही, अशी टीका शरद पवार यांनी केली.

## कवठेमहांकाळमध्ये तोतया प्राप्तीकर अधिकारी कोट्यवधींचा मुद्देमाल घेऊन फरार

### डॉक्टरला लुटले;वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल




**विटा/प्रतिनिधी:-**

स्पेशल छब्बीस या हिंदी सिनेमातील कथानकाप्रमाणे कवठेमहांकाळमध्ये प्राप्तीकर अधिकारी असल्याचा बनाव रचत एका डॉक्टरांच्या घरी अज्ञातांनी रोकडसह कोट्यवधीची लूट केल्याचा प्रकार रविवारी रात्री घडला. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. या घटनेतील तोतया अधिकार्यांनी पोबारा केला आहे. सदर घटनेतील चार संशयितांमध्ये एका महिलेचा सहभाग होता. या दृष्टीने पोलिसांचा तपास सुरू झाला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, कवठेमहांकाळ मध्ये डॉ. जी. डी. म्हेत्रे यांचे गुरुकृपा हॉस्पिटल असून सदर हॉस्पिटलमध्ये रविवारी रात्री तीन पुरुष व एका महिलेने प्राप्तीकर अधिकारी असल्याचा बनाव रचत छापा टाकला. यावेळी चौघा तोतयांनी आपले ओळखपत्र दाखवत झडती घेण्याबाबत सर्च वॉरंट असल्याचे दाखवले. त्यानंतर घरात शोधाशोध सुरू केली. अचानक प्राप्तीकर अधिकार्यांनी छापा टाकल्यामुळे डॉक्टरांच्या हॉस्पिटलमधील कर्मचारी व कुटुंबातील सदस्य घाबरले होते. यावेळी तोतया अधिकार्यांनी घरातील १६ लाखाची रोख रक्कम आणि एक किलो वजनाचे सोन्याचे दागिने, सोने असा कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल लुटून ते पसार झाले.

चोरट्यांनी जवळपास दोन कोटी रुपयांचे सोने व रोख रक्कम लंपास केल्याची चर्चा कवठेमहांकाळ शहरात रंगली आहे. कवठेमहांकाळ येथील झुरेवाडी रस्त्यावर डॉ. जगन्नाथ म्हेत्रे यांचे गुरुकृपा हॉस्पिटल आहे. याच ठिकाणी ते वास्तव्यास आहेत. त्या ठिकाणी तोतया अधिकारी असल्याचे भासवून चौघांनी दरोडा टाकला.

संशयितांनी पलायन केल्यानंतर डॉ. म्हेत्रे यांनी या छाप्याबाबत चौकशी केली. त्यावेळी हा छापा बनावट असल्याचे निदर्शनास आले. या घटनेची माहिती मिळताच कवठेमहांकाळ येथील स्थानिक गुन्हे शाखेसह पोलिसांचा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. स्थानिक गुन्हे अन्वेशनचे पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. परिसरात असणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे चोरटे कोणत्या मार्गावर गेले याचा शोध पोलिस घेत आहेत. स्पेशल छब्बीस या चित्रपटातील कथेसारख्या या प्रकाराने कवठेमहांकाळ शहरासह सांगली जिल्हयामध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## विना परवाना शस्त्र बाळगल्या प्रकरणी विट्यातील युवकास अटक

**सांगली/प्रतिनिधी:-**

विना परवाना शस्त्र व जिवंत काडतुस बाळगल्या प्रकरणी अभिषेक अविनाश काशिकर (वय १९, रा. शितोळे गल्ली, विटा, ता. खानापुर) यास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने अटक केली.

त्याच्याकडून २५ हजार रुपये किंमतीचा एक देशी बनावटीचा गावठी कट्टा व जिवंत राऊंड जप्त करण्यात आले. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग पथकास विटा ते तासगाव जाणारे रोड लगत असले मायाक्कानगर, विटा येथे सापळा रचून त्यास अटक करण्यात आली. स्थानिकगुन्हा अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक सिकंदर वर्धन, पोलीस कर्मचारी सुर्यकांत साळुंखे, उदय साळुंखे, संजय पाटील, संदीप पाटील, अमोल लोहार, शिवाजी शिद, सोमनाथ गुंडे, प्रमोद साखरपे, अभिजित ठाणेकर, सुनिल जाधव यांनी ही कारवाई केली.




कराड नगरपरिषदेने आज शहरातून जणजागृती रॅली काढली यावेळी रॅलीत सहभागी झालेले अधिकारी व कर्मचारी. छाया-अस्लम मुल्ला

## कराड नगरपालिकेचा १७० वा वर्धापन दिन साजरा

### शहरात जनजागृती रॅली;विविध उपक्रम उत्साहात

**कराड/प्रतिनिधी:-**

येथील नगरपालिकेच्या १७० व्या वर्धापन दिनानिमित्त शहरात जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी प्रशांत वटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व अधिकारी व कर्मचारी पालिकेच्या वाहनांसह सहभागी झाले होते. ही रॅली नगरपालिका प्रांगणातून सुरू होऊन कॉटेज हॉस्पिटल, दत्त चौक, चावडी चौक, कन्याशाळा मार्गे पुन्हा नगरपरिषदेत दाखल होत उत्साहात संपन्न झाली.

रॅलीनंतर नगरपालिकेच्या सभागृहात मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांनी अधिकारी व

पान ३ वर

## आदरणीय पी.डी.पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे उद्या वितरण



**कराड/प्रतिनिधी:-**

येथील आदरणीय पी.डी. पाटील गौरव प्रतिष्ठानच्यावतीने दिला जाणारा 'आदरणीय पी. डी. पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्कार' प्रदान समारंभ स्व. पी. डी. पाटीलसाहेब यांच्या स्मृतिदिनी बुधवार, दि. १७ रोजी दुपारी १२.३० वाजता यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन, टाऊन हॉल, कराड येथे आयोजित करण्यात आला आहे.

सन २०२५ चा पुरस्कार, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उद्योगपती, भारत फोर्ज पुणेचे अध्यक्ष पद्मभूषण बाबासाहेब कल्याणी यांना, ज्येष्ठ गांधीवादी नेते माजी आमदार उल्हासदादा पवार यांच्याहस्ते व राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. अशोकराव गुजर यांनी पत्रकाव्दारे दिली आहे.

प्रतिष्ठानच्या वतीने सकाळी ९.३० वाजता आदरणीय स्व. पी. डी. पाटील यांच्या, श्री शिवाजी हायस्कूल, कराड येथील समाधीस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी कराड आणि परिसरातील नागरीकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. अशोक गुजर व सर्व विश्वस्तांच्यावतीने करण्यात आले आहे.



## ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचा साताऱ्यात मोर्चा

### आठ ऑक्टोबर रोजी नागपूरमधील मुख्यमंत्र्यांच्या घरावर होणार निदर्शने

**सातारा/प्रतिनिधी:-**

ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाने सातारा शहरातून हुतात्मा उद्यान ते शिवतीर्थ पोवई नाका मार्गे जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारावर भव्य मोर्चा काढण्यात आला गेल्यास सात दिवसापासून प्रलंबित मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने संतप्त झालेल्या महासंघाच्या आंदोलकांनी जोरदार निदर्शने केली ग्रामविकास मंत्री यांच्या वेळ काढू धोरणाचा यावेळी निश्चित करण्यात आला.

हा मोर्चा महासंघाचे राज्य अध्यक्ष तानाजी ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला आहे. साताऱ्यातून निघालेल्या या मोर्चामध्ये सुमारे साडेपाचशे हून अधिक आंदोलन सहभागी झाले होते. अभयावलकर समितीच्या अहवालातील शिफारशी मान्य करणे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणे शासन अनुदान वेतनासाठी असलेली कर वसुली व उत्पन्नाची अट कायमची रद्द करणे ऑगस्ट २०२० ते मार दोन हजार बावीस पर्यंतची मागील सर्व फरकाची रक्कम मादा करणे ऑनलाईन वेतन प्रणाली मध्ये सुधारणा लोकसंख्येच्या आकृतीबंधात सुधारणा ग्रॅच्युईटीची मर्यादा पेन्शन तसेच जिल्हा परिषद अंतर्गत दहा टक्के आरक्षणातून रिक्त पदांची भरती इत्यादी मागण्या महासंघाच्या असून त्याबाबत ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आले आहे सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यासनी नागराजन यांनी ग्राम विकास मंत्र्यांबरोबर बैठक

पान ३ वर

### लोकशाही..

लोकशाहीधर्मस्थळ
सक्षम विधान भवन
संविधानाचे पावित्र्य
रे जपणूक आजीवन
संतापाच्या उद्रेकात
माते कुणी रणक्रंदन
अ संतोष उसळलेला
प्रदर्शन करे आक्रंदन
कायदा सु व्यवस्थेचे
विध्वंस तोडून बंधन
आव्हान रे व्यवस्थेला
देता उभे सरळ छेदन
निषेध व्यक्त करायचे
असलेकसले निवेदन
सांसदीय मार्ग अनेक
उचीतस्थळी आवेदन
भलेआपला हो तोटा
चुकीचे नको समर्थन
वैयक्तिक लाभास्तव
नको उगा अध:पतन
कसे घडले अघटीत
करावेसूक्ष्मविच्छेदन
ठरु शके घातक पुन:
अपराधा आच्छादन
अतिरेकी कुकृत्याची
वेळीचं आवळा गर्दन
जाण जबाबदारीची
जागवानेहमी संवेदन

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

## पालकांनी वाचन सवयीत मुलांना सहभागी करून घ्यावे

### दिग्दर्शक नागराज मंजुळे;इस्लामपुरात मुक्तांगण प्ले स्कूलमध्ये मुक्त संवाद

**इस्लामपूर/निखील कांबळे:-**

आज शाळा 'बाजार' झाली आहे, एकीकडे शाळेचे गांभीर्य हरवत चालले आहे, तर दुसरीकडे अतिरेक वाढत चालला आहे. अशा वातावरणात लहान मुलांच्या व्यक्तीमत्वाला आकार देण्यासाठी मुक्तांगण प्ले स्कूलची उपक्रमशीलता उपयुक्त ठरत आहे.

मुलांचे लाड करा; पण प्रसंगी त्यांच्यावर रागावणेही आवश्यक आहे. मोबाईल मुलांसाठी अत्यंत धोकादायक आहे. वयाच्या १० वर्षांपर्यंत मुलांना मोबाईल देऊ नका. पालकांनी स्वत: वाचनाची सवय ठेवावी आणि मुलांनाही त्यात सहभागी करावे, असे आवाहन सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते नागराज मंजुळे यांनी केले.



येथील मुक्तांगण प्ले स्कूलच्या वतीने आयोजित मुक्ताविष्कार अंतर्गत मुक्त संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. पालकांनी विविध प्रश्न विचारत नागराज मंजुळे यांचेशी संवाद साधला. विनोद मोहिते यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली. सरोजनी मोहिते यांनी स्वागत केले.

दिग्दर्शक मंजुळे म्हणाले, एखाद्या खुन्नशीपायी अपयश येते, त्यामुळे मनात कटुता बाळगू नये. पालकांनी मुलांना त्यांच्या ताकदीची जाणीव करून दिली पाहिजे, जेणेकरून त्यांना सुखदु:खात स्थिर राहता येईल. यश, कीर्ती ही कायम टिकणारी नसते. खरी श्रीमंती म्हणजे जास्तीत जास्त मित्र असणे. चित्रपट क्षेत्र आणि भविष्यातील नियोजनावर बोलताना ते म्हणाले, फिल्म क्षेत्रात येण्याचा माझा ठाम निर्णय नव्हता. केवळ चित्रपट करून समाधान मिळेल असे नाही. मला अजून वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करायची इच्छा आहे. मात्र चित्रपट बनवण्यातला आनंद कळल्यावर मी त्या दिशेने वळलो. अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करणे हा आयुष्यातील मोठा क्षण होता. मी माझ्या मुलांना मोबाईल देत नाही. त्यांच्या समोर मी स्वतः व्हिडिओ पाहत बसत नाही. त्याऐवजी त्यांना चांगले सिनेमे दाखवतो, वाचनाची आवड निर्माण करतो. यश आणि कीर्ती ही कायम टिकणारी नसते, खरी श्रीमंती म्हणजे जास्तीत जास्त मित्र असणे आणि छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधणे. जीवनात अडचणी कायम राहणारच आहेत, तेच जिवंतपणाचे लक्षण आहे.

संचालिका वर्षाराणी मोहिते यांनी आभार मानले. जलतरण स्पर्धेतील यशाबद्दल रिया मोहिते, सैनिक स्कूल निवडीबद्दल जयवर्धन मोहिते व अभिनेता फिरोज शेख यांची शॉर्ट फिल्मची राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी पालकांनी प्रश्न विचारत नागराज मंजुळे यांच्याशी संवाद साधला.

#### वाचन आणि मूल्यांची जपणूक..!

सुशिक्षित पालक वाचन करत नाहीत, हे धोकादायक आहे. मग मुलांनी वाचनाची सवय कुठून लावायची? पालकांनी आधी महात्मा फुले वाचावेत. वाचन चालू ठेवले की चांगले साहित्य आपल्याला सापडतेच. भारतातले जीवन जगणे इतर देशांच्या तुलनेत खूप सोपे आहे. प्रेम, नातेसंबंध जपा आणि मुलांना त्यांच्या पायावर उभे करा. विज्ञानवादी दृष्टीकोन अंगी बाणवा, असे आवाहनही मंजुळे यांनी यावेळी केले.

#### मी कुठेही थांबलो नाही,हेच यशाचे रहस्य.!

मी कुठेही थांबलो नाही.. चालत राहिलो, हेच माझ्या यशाचे रहस्य आहे. प्रत्येक माणूस यशस्वी होऊ शकतो. मात्र ते यश केवळ पैशात किंवा उंची गाठण्यात नसते, तर आयुष्य आनंदाने जगण्यात असते. आनंद छोट्या-छोट्या गोष्टींत दडलेला असतो. जीवनात अडचणी कायम राहणारच आहेत, पण तेच जिवंतपणाचे लक्षण आहे. जे वाहते तेच मजबूत असते, म्हणून सतत वाहते राहा असे आवाहन नागराज मंजुळे यांनी केले.

#### मुक्तांगण शाळा नव्हे,अनुभव घर!

अंगण छोटे असले तरी मुक्तांगण मध्ये खूप प्रयोगशीलता दिसली. इथली मूलं नक्की घडतील. बालपण टिकवणे गरजेचे आहे. उपक्रमशीलतेमुळे मुलांशी वेगळं आणि घट्ट नातं बनते आहे. मुक्तांगण मधले वातावरण मनाला भावले. मुलांना मुक्त राहू द्या. तरच ती फुलातील आणि घडतील.लहान वयात वेगवेगळे अनुभव देणे गरजेचे आहे. ते इथे सहज दिले जातात हे कौतुकास्पद आहे.



# अभिनय कुंभार यांची प्रधान आयकर आयुक्तपदी पदोन्नती

## शिराळा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

**शिराळा/प्रतिनिधी : –**

शिराळा या छोट्याशा गावातील एका तरुणाने आपल्या कर्तृत्वाने थेट देशाच्या प्रशासकीय सेवेतील सर्वोच्च पदांपैकी एका पदाला गवसणी घातली आहे. येथील सुपुत्र आणि भारतीय महसूल सेवेतील कर्तव्यनिष्ठ अधिकारी अभिनय कुंभार यांची प्रधान आयकर आयुक्तपदी पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या उत्तुंग यशाने शिराळा तालुक्याचे नाव देशपातळीवर उंचावले असून, त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. तत्पूर्वी ते पुणे येथे आयकर आयुक्त (टी.डी.एस.) म्हणून कार्यरत होते.

श्री. कुंभार यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (COEP) अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर, सामाजिक क्षेत्रात काहीतरी भरीव योगदान देण्याच्या आंतरिक ओढीने त्यांनी चांगल्या पगाराच्या नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर पूर्ण वेळ भारतीय



लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षेची तयारी सुरू केली. त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि दृढनिश्चयाचे फळ म्हणून, त्यांनी पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवून एक नवीन आदर्श निर्माण केला. ते संपूर्ण भारतात ८१ व्या, तर महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतीय राजस्व सेवेसाठी (IRS) निवडले गेले.

२००१ च्या बॅचचे भारतीय महसूल सेवा अधिकारी असलेल्या श्री. कुंभार यांनी आपल्या वीस वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या सेवेत कामाचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांनी अन्वेषण शाखा, आंतरराष्ट्रीय कर आकारणी, आणि कॉर्पोरेट चार्ज अशा विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. आपल्या धडाकेबाज कार्यशैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या श्री. कुंभार यांनी ५० हून अधिक वेगवेगळ्या उद्योगसमूहांवर छापे टाकून हजारो कोटी रुपयांचा बेहिशोबी कर सरकारच्या तिजोरीत जमा केला आहे. त्यांनी पॅरिस, जिनिव्हा, आणि ॲमस्टरडॅम येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधित्वही केले आहे.

सेवेपलीकडचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व श्री. कुंभार हे केवळ एक प्रशासकीय अधिकारी नाहीत, तर एक लेखक, मार्गदर्शक, कलाकार आणि सामाजिक कार्यकर्ते देखील आहेत.

युवकांसाठी प्रेरणास्रोत: त्यांनी देशभरात ५०० हून अधिक व्याख्याने आणि यु-ट्यूब व्हिडिओंच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे त्यांचे स्टील फ्रेम हे पुस्तक अत्यंत लोकप्रिय आहे.

कला आणि संगीताची आवड: त्यांना नाटक आणि संगीत क्षेत्रात विशेष रस असून, त्यांनी प्रसिद्ध पुरुषोत्तम आणि फिरोदिया करंडक स्पर्धांमध्ये अभिनय आणि दिग्दर्शनासाठी अनेक पारितोषिके जिंकली आहेत.

सामाजिक बांधिलकी: मतिमंद आणि विशेष दिव्यांग मुलांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. शिराळ्याच्या मातीत वाढलेल्या एका तरुणाचा हा प्रवास निश्चितच अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या या यशाने तालुक्याच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करा

## योगेश कदम

**वडूज/प्रतिनिधी:**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सर्वांनी मिळून यशस्वी करावे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित घटकांचे एकत्रित प्रयत्न गरजेचे आहेत. यासाठी ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच ग्रामस्थ सर्व संबंधित सरकारी कर्मचारी अधिकारी यांनी सर्व ते प्रयत्न करावेत असे आवाहन खटावचे गटविकास अधिकारी योगेश कदम यांनी केले.

पंचायत समिती कार्यालयातील बचत भवनामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा उत्साहात झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी वर्षाराणी ओमासे, बाल विकास प्रकल्प अधिकारी संगीता खाबडे, विस्तार अधिकारी माधव बोईनवाड विस्ताराधिकारी यशेंद्र क्षीरसागर, सर्व ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. श्री. कदम यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले,मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे. एकूणच गाव सर्व बाबतीत समृद्ध करावयाचे आहे. त्यासाठी अनेक पारितोषिके अनेक स्तरावर दिली जाणार आहेत. एकूण शंभर गुण आहेत. सुशासन युक्त पंचायत ,सक्षम पंचायत ,जलसमृद्ध स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजना अभिसरण, गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण ,उपजीविका ,विकास, सामाजिक न्याय ,लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोक चळवळ निर्माण करणे तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमाचा यामध्ये समावेश आहे. सर्व



यंत्रणेने मिळून गाव सक्षम करावयाचे आहे. सर्व योजना यशस्वीपणे राबवावयाच्या आहेत त्यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. प्रत्येक गाव सक्षम करणे ,आत्मनिर्भर करणे हे महत्त्वाचे आहे. प्राथमिक शाळा, अंगणवाडी अशा सर्व संस्था सुविधांनी युक्त करावयाच्या आहेत. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी यंत्रणेला सहकार्य करावे.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी चर्चेत भाग घेऊन हे अभियान यशस्वी करण्याचा निर्धार केला.

# स्पर्धा परीक्षेसाठी योग्य मानसिकता आणि सातत्याची गरज

## विशाल येळेकर

**विटा/प्रतिनिधी:**

आदर्श कॉलेज ऑफ फार्मसी, विटा येथे कॉलेज क्लबच्या वतीने एमपीएससी : परीक्षेची पद्धत, रणनीती व करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानात श्री. विशाल येळेकर, पोलीस उपनिरीक्षक, विटा यांनी विद्यार्थ्यांना एमपीएससी तयारीसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एन. व्ही. साळुंखे यांनी केले, तर डॉ. एन. एच. साळुंखे यांनी अतिथींचा परिचय करून दिला. अतिथींचा सत्कार डॉ. कैलास माळी, विभाग प्रमुख, एम.फार्म यांच्या हस्ते करण्यात आला.

आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात येळेकर यांनी स्पर्धा परीक्षेत यशस्वी




होण्यासाठी केवळ अभ्यास पुरेसा नसून योग्य मानसिकता, सातत्यपूर्ण प्रयत्न व आत्मविश्वासही तितकेच महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. तयारी करताना विद्यार्थ्यांनी स्वतःची क्षमता ओळखून वास्तववादी नियोजन करावे, अपयशाला धडा मानून पुढे वाटचाल करावी, तसेच अभ्यासक्रमाचे सखोल आकलन करून प्रत्येक मुद्दा नीट समजून घेण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. फक्त पाठांतरावर अवलंबून राहिल्यास यश कठीण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यशाच्या प्रवासात नियमित पुनरावलोकन हीच खरी गुरुकिल्ली असून सातत्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी लहान-लहान ध्येय आखून त्यांची पूर्तता करत राहणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. शेवटी, स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी स्वतःवरील विश्वास आणि आत्मविश्वास हीच खरी जमेची बाजू आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या थेट संवादात्मक मार्गदर्शनामुळे सभागृहात उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि प्रेरणेची नवी ऊर्जा संचारली.

सभागृहात उपस्थित विद्यार्थ्यांनी हा संवादात्मक व अनुभवाधारित मार्गदर्शनाचा लाभ घेतला. व्याख्यानानंतर सात विद्यार्थ्यांनी आपले अभिप्राय नोंदवले असून त्यांनी या व्याख्यानाला 'अत्यंत उपयुक्त, मार्गदर्शक आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रेरणादायी' ठरल्याचे सांगितले.

या व्याख्यानाला बी.फार्मचे २४० विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन विश्वराज देठे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मीनल कुंभार यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्राचार्य डॉ. एन. एस. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या उपक्रमाबद्दल सदाशिवराव (भाऊ) पाटील, संस्थापक अध्यक्ष, एलएचपीसीटी; वैभव (दादा) पाटील, अध्यक्ष, एलएचपीसीटी; व प्रा. पी. टी. पाटील, कार्यकारी संचालक, एलएचपीसीटी यांनी शुभेच्छा देऊन प्राचार्यांचे अभिनंदन केले.



# सातारा तालुक्यात नवरात्रौत्सव डॉल्बी मुक्त करावा

## पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांचे आवाहनं

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा तालुका हद्दीत डॉल्बीचे प्रमाण कमी झाले आहे. गणेशोत्सवात पारंपरिक पद्धतीने गणपतीच्या मिरवणुका सार्वजनिक मंडळांनी काढल्या होत्या. त्याच पद्धतीने नवरात्र उत्सवही डॉल्बी मुक्त साजरा करा असे आवाहन सातारा तालुका पोलीस ठाण्याचे पो.नि. निलेश तांबे यांनी केले.

नवरात्र उत्सव अनुषंगाने बैठक अलंकार हॉल, पोलीस करमणूक केंद्र, सातारा येथे पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी बैठकीस नायब तहसीलदार विजयकुमार धायगुडे, एमएसईबीचे सुतार, विशाल जाधव, महेंद्र नारनवर, कुंभार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

यावेळी निलेश तांबे पुढे म्हणाले पोलीसपाटील हा पोलीस आणि लोकांच्या मधील महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे पोलिसांचे काम सोपे झाले आहे. नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक मंडळांनी पोलीस प्रशासनाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. दुर्गादेवीच्या आगमन आणि विसर्जन मिरवणुकीसाठी डॉल्बी वापरू नका. कोणालाही डॉल्बीसाठी परवानगी मिळणार नाही. डॉल्बी वापरल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. प्रशासनाला सहकार्य करावे प्रशासन तुम्हाला सहकार्य करेल. तर नवरात्र उत्सव साजरा करताना वर्गणीसाठी कोणीही सक्ती करू नका अन्यथा मंडळावर कारवाई करण्यात येईल. असेही ते म्हणाले.

यावेळी कार्यक्रमात विजयकुमार धायगुडे म्हणाले महसूल विभागाच्या वतीने सर्व मदत मिळेल. त्याचप्रमांणे सातारा तालुक्यातील शेतकऱ्यांनी ईपीक नोंद लवकरात लवकर करावी. जेणेकरून तुम्हाला त्याचा लाभ मिळेल.

आगामी साजरा होणाऱ्या नवरात्र उत्सव २०२५ च्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीस सातारा तालुका पोलीस ठाणे हद्दीतील सर्व नवरात्र उत्सव मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकर्ते, शांतता कमिटी सदस्य व सर्व पोलीस पाटील उपस्थीत होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्नील साळुंखे यांनी केले तर आभार गोसावी यांनी मानले.

# बिबट्या जनजागृती कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोळे/प्रतिनिधी : –**

श्री निनाईदेवी विद्यालय, तुळसण (ता. कराड) येथे वनविभाग सातारा व वनपरिक्षेत्र कराड यांच्या संयुक्त विद्यमाने बिबट्या वन्यप्राणी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात वनपाल कांबळे यांनी विद्यार्थ्यांना बिबट्याबाबत सखोल माहिती दिली. बिबट्या हा मांजर जातीतील प्राणी असून, सहसा माणसावर हल्ला करत नाही. मात्र, त्याला धोका वाटल्यास, अथवा समोरचे भक्ष्य वाटल्यास तो हल्ला करू शकतो, असे त्यांनी सांगितले.

बिबट्याच्या खाद्य साखळीविषयी माहिती देताना वनरक्षक संतोष पाटील म्हणाले, खेकडे, ससे, कुत्रे व शेळ्या हे त्याचे प्रमुख अन्न आहे. जंगलाचा अधिवास कमी झाल्याने बिबट्या आता गावांमध्ये शिरकाव करू लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रानात जाताना एकटे जाऊ नये, हातात काठी ठेवावी, रात्रीच्या वेळी टॉर्च किंवा मोबाईल घेऊन, गटाने



बाहेर पडावे. बिबट्याच्या उपस्थितीची शक्यता असल्यास सतत बोलत राहावे, जेणेकरून तो पळून जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

कार्यक्रमास वनपाल डी.बी. कांबळे, वनरक्षक संतोष पाटील, वनरक्षक चिवटे उपस्थित होते. स्वागत मुख्याध्यापक कल्याण कुलकर्णी, प्रास्ताविक शिक्षक आनंद जानुगडे, श्री जाधव यांनी आभार मानले.

# रितेश देशमुख श्रीक्षेत्र महाबळेश्वर भेटीवर

## राजा शिवछत्रपती चित्रपटासाठी लोकेशन पाहणी

**प्रतापगड/प्रतिनिधी:**

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता रितेश देशमुख यांनी आपल्या आगामी ऐतिहासिक चित्रपट राजा शिवछत्रपती च्या शूटिंगसाठी लोकेशन पाहणी करण्यासाठी श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथे आगमन केले. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या पवित्र स्थळाच्या ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक वैभवाने प्रभावित होत त्यांनी विविध स्थळांची पाहणी केली.

या दौऱ्यात रितेश देशमुख यांनी कृष्णामाई मंदिर परिसराला भेट देऊन दर्शन घेतले. कृष्णामाईच्या दर्शनावेळी ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. स्थानिक नागरिकांच्या वतीने त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी राजमाता जिजाऊंना सुवर्ण तुला केल्याचा प्रसंग दर्शविणारे चित्र भेट देण्यात आले. या दुर्मीळ भेटवस्तूचा स्वीकार करताना



रितेश देशमुख भावूक झाले. त्यांनी छत्रपतींच्या जीवनगौरवातून प्रत्येकाला प्रेरणा मिळते, असे सांगत राजा शिवछत्रपती या चित्रपटाद्वारे शिवचरित्र भव्य व ऐतिहासिक पद्धतीने उभे करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यानंतर त्यांनी श्रीक्षेत्र महाबळेश्वर व परिसरातील विविध धार्मिक, ऐतिहासिक व निसर्गरम्य स्थळांना भेट दिली. या ठिकाणांची अनोखी शोभा व ऐतिहासिक महत्त्व पाहून ते प्रभावित झाले. या परिसरातील लोकेशन्स चित्रपटाच्या भव्यतेसाठी अतिशय उपयुक्त आहेत. आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर लवकरच येथे शूटिंग सुरू करण्याचा मानस आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या भेटीच्या प्रसंगी श्रीक्षेत्र महाबळेश्वरमधील युवा कार्यकर्ते प्रदीप कात्रट, सरपंच सुनील बिरामणे, महाबळेश्वर अर्बन बँकेचे संचालक प्रशांत कात्रट, तसेच अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

स्थानिक ग्रामस्थांनी रितेश देशमुख यांच्या या ऐतिहासिक उपक्रमाचे स्वागत करत, श्रीक्षेत्र महाबळेश्वरचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा चित्रपटाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर पोहोचावा, अशी आशा व्यक्त केली.

# ग्रामपंचायत कर्मचारी...

पान १ वरुन

लावली जाईल अशा आश्वासन दिले होते मात्र गेल्या सात दिवसापासून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने आंदोलक संतप्त झाले.

आंदोलकांनी हुतात्मा उद्यान चौक ते शिवतीर्थ असा भव्य मोर्चा काढला तेथे छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तो मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावरून जिल्हा परिषदेकडे मार्गस्थ झाला .जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली जयकुमार गोरे यांनी या मागण्याची तात्काळ दखल घ्यावी जर सरकारने या मागण्याची दखल घेतली नाही तर येत्या ८ ऑक्टोबर रोजी राज्यातील ७५००० ग्रामपंचायती कर्मचारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानावर मोर्चा काढतील असा इशारा देण्यात आला


## आज का अंदाज

**मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर २०२५**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ० - १ - ४ - ७ | ३ - ५ - ६ - ९ |
| १३६-२४५-२६६-१२४ | १४८-६९०-१७८-१९९ |
| ३७०-५६०-६९९-२७८ | ३४६-७८०-३५८-५७७ |
| ५७८-३८०-७७०-४६७ | २३८-५००-२७७-३६० |
| **जोडी** | **जोडी** |
| ०२ - १२ - ४३ - ७३ | ३० - ५० - ६१ - ९१ |
| ०५ - १५ - ४६ - ७६ | ३२ - ५२ - ६४ - ९४ |
| ०८ - १८ - ४९ - ७९ | ३८ - ५८ - ६७ - ९७ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १६-१७ सप्टेंबर
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर २०२५**

सर्व बाजार साठी

२१ - ५१ - ६० - ९०
२४ - ५६ - ६८ - ९८
२३ - ५३ - ६७ - ९७

३९० - ६९० - २७७ - १९९
४८० - १५९ - ७९० - २८९
५७० - २५८ - ४५७ - ३७९

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट |
|---|---|
| ३८९ ११८ २३५ **०** २३४ ३७९ ४७८ **९** ३४६ ४९० ५८० **३** | १८९ ३७८ २२४ **८** १७८ ३५८ २७७ **६** २३० ३४८ ७८० **५** |

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट |
|---|---|
| २४६ ३९० ४८० **२** ४४६ ३४७ ५९० **४** २४० ३६७ ४६६ **६** | १२० २५६ ३४६ **३** १६८ ३४८ २६७ **५** १६० ३४० २७८ **७** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट |
|---|---|
| ३५५ ४७० ५६० **१** ३०० ६७० ४४५ **३** २६६ ६९९ ७७० **४** | २३७ ५७० ४८० **२** २४९ ४५६ ३५७ **५** १३४ ३५० ५६७ **८** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट |
|---|---|
| १४९ २४८ ३४७ **४** ६९० ७८० ५०० **५** १५० २६८ ७९० **६** | १७० ३६९ २६० **८** ३६० ४५० ५५९ **९** ३७० ४६० ५५० **०** |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
० - ८ - ९ - २
६

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १५-०९-२०२५ १६-०९-२०२५ १७-०९-२०२५
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४




# आदर्श इंजिनिअरिंग कॉलेज विटा तर्फे मोही येथील जलहरी वृद्धाश्रमाला भेट

**विटा /प्रतिनिधी:**

लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँण्ड रिसर्च सेंटर, विटा च्या इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागातर्फे सामाजिक उपक्रमांतर्गत जलहरी वृद्धाश्रम, मोही येथे भेट देण्यात आली.

या भेटीत प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. त्यांचे अनुभव जाणून घेतले आणि आपुलकीचा वेळ दिला. त्याचबरोबर फळे, गोड पदार्थ व खाद्यपदार्थ यांचे वाटप करून आनंदाची देवाण-घेवाण करण्यात आली.

वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक राजेश गडकरी व कु. प्रतिभा गुरव त्यांच्या कार्याला सलाम देत शिक्षक व विद्यार्थ्यांनी मनःपूर्वक कौतुक केले. हा उपक्रम घेतल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सदाशिवरावभाऊ पाटील व संस्थेचे अध्यक्ष वैभवदादा पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आजच्या तरुण पिढीला वृध्दाश्रमात जीवन जगणाऱ्या वृद्धांच्या व्यथा समजल्या तर नक्कीच ते आपल्या कुटुंबातील वृद्धांची सेवा करतील, समाजातील गरजू ना मदत करतील त्यामुळे हा उपक्रम आदर्शवत आहे असे मत व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाच्या संचालिका पूजा पाटील यांनी या सामाजिक कार्याबद्दल समाधान व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या संवेदनशीलतेचे कौतुक केले. भेटीच्या यशस्वी आयोजनासाठी विभाग प्रमुख डॉ. अर्जुन निचळ, एम. डी. भांबुरे, ए. डी. घोरपडे, पी. बी. यादव, सौ. एस. आर. गोरे व सौ. एस. एस. पाटील यांनी परिश्रम घेतले.

# शांताराम तोरस्कर यांचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी : –**



कासार कोळवण (देवरुख), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील कांडकरी विकास मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक दिलीप तोरस्कर व नितीन तोरस्कर यांचे वडील शांताराम बाबाजी तोरस्कर यांचे आकस्मित निधन झाले. त्याचे कार्यविधी शुक्रवार, दि. १९ रोजी सकाळी ९ वाजता ६७, डी १५ द्रोणागिरी नागरी निवारा सोसायटी, नागरी निवारा परिषद झोन २, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग गोरेगाव पूर्व-मुंबई ६५ येथे निवासस्थानी होणार आहे.

# जिल्हा रुग्णालयात १७ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिर

**सातारा/प्रतिनिधी:**

रक्तदान करा जीवन वाचवा रक्त देऊया आशा जागूया, एकत्रितपणे जीव वाचवूया. रक्तदान अमृत महोत्सवानिमित्त स्वर्गीय क्रांतीसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालय सातारा ब्लड बँक येथे दिनांक १७ . सप्टेंबर रोजी सकाळी १०.००ते ०२.०० वाजेपर्यंत ऐच्छिक रक्तदान आयोजित केलेले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी, गरजू रुग्णांसाठी, रक्तदान हे एक महान कार्य आहे .यामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. दर तीन महिन्यातून एकदा रक्तदान करावे. रक्तदानामुळे कोणतीही कमजोरी किंवा अशक्तपणा येत नाही. रक्त तयार करण्याचा ना कुठला कारखाना असतो ना कुठली प्रयोगशाळा त्यामुळे रक्तदान करणे आवश्यक आहे.

सत्कार्यासाठी शक्तीची नव्हे तर माणुसकीची गरज आहे. १८ ते ६५ वर्षांमधील व्यक्ती दर तीन महिन्यातून रक्तदान करू शकते. अधिकृत रक्तपेढीतूनच रक्त घ्या कारण हे एच आय व्ही, हेपेटाइटिस बी आणि सी, मलेरिया आणि सिफिलिस यापासून मुक्त असते. रक्त तयार करण्यासाठी फक्त एकच आश्चर्यजनक कारखाना आहे तो म्हणजे मानवी शरीर म्हणून रक्तदान करणे फार महत्त्वाचे आहे. तरी इच्छुकांनी रक्तदान करून सहकार्य करावे असे आवाहन सिव्हिल सर्जन डॉक्टर युवराज करपे यांनी केले आहे. स्वर्गीय क्रांती सिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढी क्रमांक २२ येथे रक्तपेढीचे प्रमुख डॉ.रामचंद्र जाधव यांच्याशी संपर्क साधावा.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ४४४८ प्रकरणे निकाली

**सांगली/प्रतिनिधी:–**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हयातील सर्व तालुक्यांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन केले होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत आयोजित केली होती.

प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. डी. निंबाळकर यांनी उपस्थित पक्षकारांना जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने मिटवून घेवून आपला वेळ व पैसा वाचवावा असे आवाहन केले.

जिल्हा न्यायाधीश एस. आर. पडवळ, एम. एस. काकडे, ॲड. अशोक वाघमोडे, ॲड. व्ही. एम. देशपांडे हे उपस्थित होते. लोक अदालतमध्ये जिल्ह्यातील २८९२ दावापूर्व प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. सर्व न्यायालयातील मिळून १५५६ प्रलंबित प्रकरणे होती.

सदर लोकअदालतमध्ये सांगली जिल्हयातून ६९ कोटी १६ लाख ८१ हजार ९२९ इतक्या रकमेची वसुली करण्यात आली. तसेच मोटार वाहतूक चलानची १ लाख ७ हजार ७५० रुपये जमा झाले.

सदर लोकअदालतीमध्ये सांगली मुख्यालय पॅनेलप्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश एस. आर. पडवळ, एम. एस. काकडे, एस. बी. माने, एम. एस. कोचर, ए. ए. वाळुजकर, पी. आर. वागडोळे, ए. आर. कोल्हापुरे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आर. एस. पाटील, व्ही. ए. आद्य, जे. एस. मकानदार, ओ. एस. शास्त्री उपस्थित होते.

# कराड नगरपालिकेचा..

पान १ वरुन

कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. वर्धापन दिनानिमित्त नगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये स्वच्छ विभाग स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये ई-गव्हर्नन्स विभागाने प्रथम क्रमांक मिळवला. दरम्यान, स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये देशपातळीवर कराड नगरपालिकेला मिळालेला द्वितीय क्रमांक हा अभिमानाचा ठेवा असल्याचे गौरवोद्गार मुख्याधिकारी व्हटकर यांनी काढले.

वर्धापन दिनानिमित्त नगरपालिकेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना पालिकेतील विविध विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# देगाव येथून महिला बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा तालुक्यातील देगाव पाटेश्वर येथून दि. १३ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या पुर्वी पोर्णिमा अविनाश साळुंखे वय २३ ही कोणास काही न सांगता निघून गेली आहे. त्याची तक्रार अविनाश हिंदूराव साळुंखे याने सातारा तालुका पोलीस ठाण्यात दिली असून याचा तपास महिला पोलीस हवालदार गायकवाड या करत आहेत.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

## नशिबाची परीक्षा

मंगळवार १६ सप्टेंबर २०२५

**मिलनम डे** — उदय-अस्त | सिंगल ०-३-१ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 190 280 244 | 0-4 | 156 129 | 06-24-73-81-45 |

**कल्याणम** — उदय-अस्त | सिंगल ७-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 160 278 223 | 7-1 | 146 128 100 | 79-31-40-52-18 |


**मुंबैम ( मेन )** — उदय-अस्त | सिंगल ६-२-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 169 268 600 | 6-3 | 120 238 490 | 60-13-25-89-34 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक
मो.नं. ९९७५४७९८२६

# सांगलीत महत्वाचे ५ रस्ते लवकरच होणार विकसित

**सांगली / प्रतिनिधी:–**



महापालिका विकास योजनेतील रस्ते विकसित करण्याच्या अनुषंगाने रस्त्यामध्ये येणारी जागा ळऊफ द्वारे ताब्यात घेण्यात येणार असल्याचे आयुक्त सत्यम गांधी यांनी सांगितले.

महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेच्या नकाशातील काही प्रमुख रस्ते तसेच शासनाच्या नगरविकास विभागाकडील एरिया मधील तरतुदीनुसार असणारे ५ रस्ते विकसित करण्यासाठी सहा. संचालक नगररचना व शहर अभियंता समवेत आयुक्त यांनी स्थळपाहणी केली होती. यामध्ये विजयनगर कोर्ट बिल्डिंग कुंभारमळा धामणी ग्रामपंचायत हद्दीतून रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा संलग्न रस्ता, विश्रामबाग रस्ता, स्फूर्ती चौक सहयोग नगरपासून धामणी ग्रामपंचायत हद्दीतून रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा संलग्न रस्ता, पंढरपूर स्मशानभूमीपासून रमा उद्यान पूर्व बाजू खाडे शाळेसमोरील रस्ता सांगलीकर मळा-दिडीवेस टाकळी रस्ता चौक, वखारभाग म्हैशाळ उड्डाण पुलाकडे जाणारा १०० फुटी रस्ता, कृपामाई हनुमान मंदिर सिनर्जी हॉस्पिटल भारतनगर ईदगाह मैदान गेस्ट हाऊस रस्ता कॉलेज पर्यंतचा १०० फुटी रस्ता व जुना हरीपूर रोड यांचा समावेश आहे.

या रस्त्यांचा मनपा हद्दीतील बहुतांश भाग मनपाच्या ताब्यात आहे तसेच, काही भाग खासगी मिळकत धारकांकडून ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर रस्त्यांमध्ये येणारी खासगी मिळकतधारकांकडे असणारी जागा ताब्यात घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याकामी रस्त्यामधील काही भाग शासकीय रुग्णालय मिरज, गेस्ट हाऊस, सार्वजनिक बांधकाम विभाग इ. शासनाच्या विभागाकडून ताब्यात घेणे आवश्यक आहे. याअनुषंगाने कार्यवाही करुन व पत्रव्यवहार करुन रस्त्यांची जागा लवकरात लवकर महापालिकेच्या ताब्यात घेण्यासाठी नगररचना आणि शहर अभियंता यांना आयुक्त सत्यम गांधी यांनी आदेश देऊन कार्यवाहीचा अहवाल ७दिवसात सादर करण्याचे आदेश आयुक्त सत्यम गांधी दिले आहेत.

# नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त भाजप 'सेवा पंधरवडा अभियान' राबविणार

## आ.डॉ. अतुल भोसले' जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन

**कराड/प्रतिनिधी : –**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्यावतीने जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान 'सेवा पंधरवडा अभियान' राबविण्यात येणार आहे. यानिमित्त रक्तदान व आरोग्य शिबीरे, स्वच्छता, सामाजिक सेवा, वृक्षारोपण अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.डॉ. अतुल भोसले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

या अभियानाची सुरुवात १७ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिरांनी होणार असून, १७ ते २४ सप्टेंबर दरम्यान जिल्ह्यात विविध ठिकाणी स्वच्छता अभियान व आरोग्य शिबिरे भरविली जाणार आहेत. तसेच कुपोषण निर्मूलन आणि पोषण आहार वितरण यावर विशेष भर दिला जाणार आहे. १९ व २० सप्टेंबर रोजी पंतप्रधानांच्या जीवनावर आधारित माहितीपटाचे प्रदर्शन, तसेच त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाटप केले जाईल. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान पंतप्रधानांच्या जीवनावर आधारित प्रदर्शनाचे आयोजनही केले जाणार आहे. २२ व २३ सप्टेंबर रोजी विशेष व दिव्यांग व्यक्तींचा सन्मान आणि त्यांना उपकरणांचे वितरण केले जाणार आहे.

२५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण, बुथ कार्यकर्ता बैठक, 'व्होकल फॉर लोकल' अभियानाचा प्रसार करण्यात येणार आहे. २७ व २८ सप्टेंबर रोजी भाजयुमोच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात मोदी विकास मॅरेथॉन, तसेच २५ डिसेंबरपर्यंत खासदार चषक स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून, ठिकठिकाणी स्वच्छता अभियान राबवून या सेवा पंधरवडा अभियानाची सांगता होणार आहे. या अभियानात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दौऱ्याने रखडलेल्या कामांना संजीवनी

## आ.चेतन तुपे पाटील

**पुणे/प्रतिनिधी :–**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी दोन दिवसाचा दौरा हडपसर विधानसभा मतदारसंघांमध्ये केला. त्यामध्ये हडपसर मतदार संघातील विविध कामांना चालना देण्यासाठी व वाहतूक व्यवस्था त्याचप्रमाणे गोदरेज पूल बऱ्याच दिवसापासून रखडलेले काम मार्गी लावण्यासाठी अनेक नागरिक समस्या घेऊन लोक जनजीवन जगत आहेत. असे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी नागरी समस्या सोडवण्यासाठी आपला बहुमूल्य वेळ हा हडपसर विधानसभा मतदारसंघाला दिला असे उदगार हडपसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चेतन दादा तुपे पाटील म्हणाले पंचायत समिती सदस्य जितिन दादा कांबळे यांनी केशवनगर हडपसर मांजरी येथील समस्याचा पाढा अजितदादांना सांगितला महिलांनी देखील प्रश्न विचारले. दादांच्या सडेतोड उत्तराने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले दादा ने लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता कामाची पाहणी करण्याचे नियोजन केले गोदरेज फुलाचे रखडलेले काम त्याचप्रमाणे नागरिकांना समोरासमोर प्रश्न मांडण्याची संधी दिली.

जिल्ह्याचे कलेक्टर यांना ताबडतोब फोन करून रखडलेले पुलाचे काम सुरू करण्याचे आदेश दिले. परंतु दादाचा हा दोन दिवसाचा दौरा हा राजकीय लक्ष वेधी करणारा दौरा असे समजले जाते छत्तीस गावांचा पुणे महानगरपालिकेमध्ये झालेला समावेश त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद व कार्यकर्ताना पुणे महानगरपालिकेच्या होऊ घातलेल्या निवडणुकी संदर्भात जणू काही सूचनाच देण्यात आलेल्या आहेत असे समजले जाते. उपनगरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद खूप आहे त्यामुळे सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, आजी माजी नगरसेवक यांना दादांनी सूचना दिल्याचे निदर्शनास आल्याचे चित्र दिसून आले कसल्याही परिस्थितीमध्ये सर्व कार्यकर्त्यांनी जोर लावून पुणे महानगरपालिकेमध्ये जास्तीत जास्त नगरसेवक निवडून येतील याकडे लक्ष दिले पाहिजे असे आमदारांना देखील सांगितले हा दादांचा दौरा खूप काही शिकवून जातो अशी कार्यकर्त्यांमध्ये आणि चर्चा चालू आहे केशवनगर विभागामध्ये दादांनी पाहणी करताना मा. पंचायत समिती सदस्य जितीन कांबळे, ऋषिकेश गायकवाड यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी दादांना केशवनगर मांजरी समस्या सोडविण्याचे निवेदनही दिले येणाऱ्या महापालिका निवडणूक मध्ये नवनिर्वाचित कार्यकर्ते जोमाने काम करत आहेत त्यांच्या बद्दल करावी लागते कामाला गती मिळण्याचे संकेत मिळाले आहेत.

दादांचा हा दौरा हा कार्यकर्त्यासाठी काम कसे करावे लागते आणि किती मेहनत घ्यावी लागते असे सांगणारा दौरा आहे त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले महिला कार्यकर्त्यांनी देखील हजेरी लावली होती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी यांनी दादा बरोबर मनसोक्त गप्पा मारून चर्चा केली

# विट्यात चारचाकीने घेतली पाण्यात खोच

## खानापूर रोडवरील हणमंतनगरमधील प्रकार

**विटा/ प्रतिनिधी:–**



एक चारचाकी पंच गाडी खानापूरला जात असताना हणमंतनगर येथे आली असता जोरदार पावसामुळे रस्त्याच्या कडेला पाणी तुंबलेल्या खड्ड्यात घसरली. रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्यात गाडीने खोच मारली. ही गाडी क्रेनच्या सहाय्याने नाल्याबाहेर काढली.

विटा परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेच्या नाल्याना काही ठिकाणी तलावाचे स्वरूप आले आहे. वाहनधारकाना पाण्याचा अंदाज येत नाही. विट्याहून खानापूरला निघालेल्या एका चारचाकी पंच गाडीने रस्त्याच्या कडेला असलेयाया नाल्यात खोच मारली आणि पाण्याचा अंदाज न आल्याने गाडी नाल्यात बुडाल्याची घटना घडली. यापूर्वी एक एस.टी. बसही अशाच पद्धतीने हणमंतनगर परिसरातील रस्त्याच्या कडेला नाल्यात घुसली होती. पावसाचे प्रमाण जास्त असल्याने आणि नाल्यात पाणी जास्त असल्याने चालकाला पाण्याचा अंदाज आला नाही. जेसीबी आणि क्रेनच्या सहाययाने पंच गाडी नालयातून बाहेर काढण्यास यश आले.

# व्यावसायिक दांडिया-गरब्यांविरोधात सकल हिंदू समाज आक्रमक

## कराडमध्ये आयोजनावर बंदीची मागणी; महिला सुरक्षेचा प्रश्न, संस्कृतीच्या विकृतीकरणाचा आरोप

**कराड/प्रतिनिधी : –**



नवरात्रोत्सव हा माता दुर्गेचा भक्तिभावाने साजरा होणारा पवित्र उत्सव आहे. या काळात व्यावसायिक स्वरूपात आयोजित होणाऱ्या दांडिया-गरबा कार्यक्रमांवर बंदी घालावी, अशी ठाम मागणी कराडमधील सकल हिंदू समाजाने केली आहे. अशा कार्यक्रमांमुळे महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न निर्माण होतात, तसेच हिंदू संस्कृतीचे विकृतीकरण होत असल्याचा आरोप करत असे कार्यक्रम झाल्यास तीव्र पडसाद उमटतील, असा सज्जड इशारा समाजाने प्रशासनाला दिला आहे.

सोमवारी सकल हिंदू समाजाच्या वतीने पोलीस प्रशासनाला यासंदर्भातील निवेदन देण्यात आले. निवेदनावर अनेक समाजबांधवांची नावे आहेत. त्यानंतर शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत समाजाने आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी समाजबांधवांनी सांगितले की, नवरात्रोत्सव हा भक्तिभाव, भजन-कीर्तन आणि पारंपरिक दांडियांचा उत्सव आहे. परंतु, कराड शहर व परिसरातील काही हॉटेल्स, लॉन्स आणि इव्हेंट कंपन्या व्यावसायिक फायद्यासाठी तथाकथित डिस्को गरबा आयोजित करत असल्याचे निदर्शनास येते. यामुळे महिलांच्या सुरक्षेचे गंभीर प्रश्न निर्माण होतात, तसेच चुकीच्या प्रवृत्तींना खतपाणी मिळते आणि उत्सवाचे पावित्र्य कलंकित होते. नवरात्राचे पावित्र्य नष्ट करून समाजासमोर चुकीचा संदेश दिला जात आहे. यांमुळे महिलांचा सन्मान धोक्यात येतो आणि हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या जातात. अशा कार्यक्रमांना परवानगी दिल्यास तीव्र आंदोलनात्मक भूमिका घेतली जाईल, असा इशारा यावेळी समाजाच्या वतीने देण्यात आला.

यावेळी समाजाने प्रशासनाकडे कराड शहर व परिसरात व्यावसायिक दांडिया-गरबा कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशा कार्यक्रमांचे आयोजन झाल्यास आयोजकांवर कठोर कारवाई करावी,

उत्सव काळात महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिस प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, असे कार्यक्रम संबंधित समाजापुरते मर्यादित राहावेत; अन्य धर्मीयांना प्रवेश नाकारावा, हॉटेल, लॉन व कॅफे मालकांनी आपली ठिकाणे अशा व्यावसायिक कार्यक्रमांसाठी उपलब्ध करून देऊ नयेत, अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

दरम्यान, गणेशोत्सव काळात प्रशासनाचे उत्कृष्ट नियोजन व देखावे आणि विसर्जन मिरवणुकांसाठी केलेल्या सहकार्याबद्दल समाजाने कृतज्ञता व्यक्त केली. त्याच धर्तीवर नवरात्रोत्सवातही प्रशासनाने सहकार्य करावे, अशी मागणी केली आहे. तसेच, स्पीकर परवाने नियमानुसार द्यावेत व दसऱ्यानंतर दोन दिवस विसर्जनासाठी मुभा द्यावी, अशीही मागणी केली आहे.

# विटा महसूल उपविभाग जिल्ह्यात चमकला

## प्रांताधिकारी विक्रम बांदल यांचा सांगलीत गौरव;महसूल कामकाजाचे मूल्यांकन

**विटा /प्रतिनिधी:–**



राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या कामकाजाच्या मूल्यांकनात विटा उपविभागाने पुन्हा एकदा आपली चमक दाखवली. जिल्ह्यात विटा उपविभागीचा पहिला क्रमांक आला आहे. सांगली येथे जिल्हास्तरीय आढावा बैठकीत अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या हस्ते विटा उपविभागाचे प्रांत अधिकारी डॉक्टर विक्रम बांदल यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सांगली जिल्ह्यात महत्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत महसूल विभागाच्या विविध कामकाजाचे मूल्यांकन करण्यात आले.

विटा उपविभागीय अधिकारी डॉक्टर विक्रम बांदल यांच्या नेतृत्वाखाली विटा उपविभागाने महसूल वसुली, फेरफार निर्गतीस लागणारा कालावधी कमी करणे, अपील प्रकरणे जल गतीने निकाली काढणे, शेतकरी नोंदणी, लक्ष्मीमुक्त योजना, मिशन कर्मयोगी अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण तसेच सामाजिक दृष्ट्या मागास घटकांना दाखले निर्गत करणे या सर्वच घटकांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कामकाजाचे मूल्यांकन करण्यात आले. या सर्व बाबीत विटा उपविभागाने जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल विटा उपविभागीय अधिकारी डॉक्टर विक्रम बांदल यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

विटा उपविभागाला मिळालेला हा मान महसूल विभागातील कार्यक्षमता, पारदर्शकता आणि जनतेला दिलेल्या वेगवान सेवेचा दाखला असल्याचे मत जिल्हा आढावा बैठकीत अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी व्यक्त केले. यावेळी जिल्हाधिकारी अशोक काकडे. निवासी उपजिल्हाधिकारी डॉक्टर स्नेहल कनिचे, उपजिल्हाधिकारी अजय पवार. मिरजेचे उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे. उपजिल्हाधिकारी शिवाजी जगताप. राजीव शिंदे. विवेक काळे. तसेच तहसीलदार योगेश्वर टोंपे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



# व्यसन परावृत्तीसाठी ज्ञानप्रबोधिनी देणार शिक्षकांना प्रशिक्षण

## प्रबोधनाचे मॉड्युल यशस्वी करण्याचे पालकमंत्र्यांचे आदेश

**सांगली/ प्रतिनिधी:**

जिल्ह्यातील किशोरवयीन मुलांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी दिवाळीनंतर जिल्ह्यातील शिक्षकांचे प्रशिक्षण सत्र घेण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक व भावनिक गरज लक्षात घेऊन विविध विषय हाताळणारे प्रबोधनाचे सर्वसमावेशक मॉड्युल राबवण्यात येणार आहे. त्यासाठी नोव्हेंबरमध्ये जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे, याचे पूर्वनियोजन काटेकोर करून हे मॉड्युल यशस्वी करावे, असे आदेश उच्च व तंत्र शिक्षण तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी येथे दिले.

याबाबत नियोजन करण्यासाठी आयोजित जिल्हास्तरीय बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, माध्यमिक शिक्षणाधिकारी राजेसाहेब लोंढे, प्राथमिक शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड, पालकमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्था, पुण्याच्या प्रतिनिधी डॉ. अनघा लवळेकर, उपक्रम समन्वयक अश्विनी देशपांडे, मुख्य प्रशिक्षक दीपाली शेंडे आदि उपस्थित होते. सांगली जिल्ह्यात अमली पदार्थविरोधी मोहीम सुरू करून व्यसनमुक्तीची चळवळ उभी करण्यात आली आहे.

यासाठी कायद्याचा धाक, प्रबोधन आणि चिकित्सा व उपचार या त्रिसूत्रीतून काम सुरू असल्याचे सांगून पालकमंत्री पाटील म्हणाले, प्रबोधनाच्या पुढील टप्प्यात ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्था, पुण्याच्या माध्यमातून आठवी ते दहावीतील किशोरवयीन मुलांचे प्रबोधन करण्याच्या अनुषंगाने एक सर्वसमावेशक मॉड्युल राबवण्यात येणार आहे. यामध्ये किशोरवयीन विद्यार्थ्यांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

# अपघातातील मृताच्या कुटुंबियांची ना.मकरंद पाटील यांनी घेतली भेट

## वनविभागाच्या वतीने तात्पुरत्या स्वरूपाची मदत

**महाबळेश्वर/प्रतिनिधी : –**



महाबळेश्वर – तापोळा रस्त्यावर चिखली गावच्या हद्दीत गुरूवारी दुचाकी चालवत असताना माकडाने आनंद जाधव यांच्यावर झडप घातल्याने अपघात झाला. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबीयांची देवळी- मु-हा, (ता. महाबळेश्वर) येथे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी भेट देऊन त्यांना वनविभागाच्या वतीने तात्पुरत्या स्वरूपाची दहा हजार रुपयांची मदत मंत्री महोद्याच्या हस्ते देण्यात आली.

आनंद सखाराम जाधव हे ठार झाले तर त्यांच्या पत्नी जखमी झाल्या आहेत. आनंद जाधव हे गुरुवारी सायंकाळी महाबळेश्वरहून पत्नीसमवेत दुचाकीवरून तापोळा रस्त्यावरून देवळीकडे निघाले होते. चिखली परिसरात त्यांची दुचाकी आली असता अचानक दुचाकीवर एका माकडाने झडप घातली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे जाधव यांचा दुचाकीवरील ताबा सुटला. यामुळे पती-पत्नी दोघेही रस्त्यावर कोसळले. यामध्ये जाधव यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. तर या अपघातात त्यांच्या पत्नीही जखमी झाल्या आहेत.

या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी महाबळेश्वर महादेव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी सुनिल लांडगे यांनी औषधोपचारासाठी आर्थिक मदत मा. मंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते सुपूर्त करून पीडित कुटुंबाचे सांत्वन केले. या वेळी जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र शेठ राजपुरे, पंचायत समितीचे माजी सभापती धोंडीराम जंगम, प्रवीण भिलारे, शशिकांत भिलारे, सागर कदम, विठ्ठल जाधव, विजय ढेबे, निलेश जाधव, विकास जाधव, व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, महाबळेश्वर तालुक्यातील प्रमुख रस्त्यासह प्रेक्षणीय स्थळे तसेच मुख्य बाजारपेठेत देखील माकडांचा उपद्रव वाढला आहे. खाद्याच्या शोधात माकडांचा मुक्त वावर डोकेदुखी ठरत असून नागरिकांसह पर्यटकांकडून अन्न हिसकावणे, गाड्यांवर उड्या मारणे, रस्त्याच्या मधोमध थवेच्या थवे बसणे यामुळे अपघातांना आमंत्रण मिळत आहे. यावर वन विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे, असल्याच्या सूचना मंत्री मकरंद पाटील यांच्याकडून देण्यात आल्या.

देवळी- मु-हा, (ता. महाबळेश्वर) : माकडाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या कुटुंबीयांना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी वनविभागाच्या वतीने तात्पुरती मदतीचा चेक सुपूर्द केला. त्यावेळी महाबळेश्वर तालुक्याचे नेते मा. राजेंद्रशेठ राजपुरे, पंचायत समितीचे माजी सभापती धोंडीराम जंगम, प्रवीण भिलारे, शशिकांत भिलारे, सागर कदम, विठ्ठल जाधव, विजय ढेबे, निलेश जाधव, विकास जाधव व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पी.डी. पाटील सहकारी पाणी पुरवठा संस्थेची वार्षिक सभा उत्साहात

**कराड/प्रतिनिधी : –**



आदरणीय स्व. पी. डी. पाटील यांनी स्थापन केलेल्या पी. डी. पाटील सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि., कराड या संस्थेची ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी, दि. १२ रोजी संस्थेच्या कार्यालयात झाली. अध्यक्षस्थानी राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री, तसेच संस्थेचे मार्गदर्शक माजी आ. बाळासाहेब पाटील होते.

सभेच्या प्रारंभी विविध क्षेत्रातील दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविकात संचालक डॉ. पार्थेश पाटील यांनी संस्थापक स्व. पी. डी. पाटील यांच्या कार्याचा गौरव करत गेल्या ६० वर्षांत वाकाण शिवारातील शेतकऱ्यांच्या झालेल्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. सेक्रेटरी श्री. रामचंद्र पानवळ यांनी सभेची नोटीस वाचन करून कार्यक्रमपत्रिकेवरील विषयांवर चर्चा केली. सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना बाळासाहेब पाटील यांनी संस्थापक स्व. पी. डी. पाटील यांच्या कार्याचा गौरव करत, गेल्या ६० वर्षांत वाकाण शिवारातील शेतकऱ्यांची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती ही त्यांच्या दूरदृष्टी व कार्यामुळेच शक्य झाली, असे मत व्यक्त केले. तसेच संस्थेच्या कामकाजाचे कौतुक केले. संस्थेच्या कार्यालयीन इमारतीचा वापर शेतकरी व नागरिक धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी करत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. इमारतीची दुरुस्ती व वाढीव बांधकामाविषयी संचालक मंडळाने योग्य निर्णय घ्यावा, अशी सूचना त्यांनी केली. कराड नगरपरिषदेच्या हद्दवाढीमुळे संस्थेपुढे निर्माण झालेल्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी सामूहिक विचारविनिमय करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

संस्थेचे संचालक श्री. येडगे यांनी आभार मानले. यावेळी विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, संचालक, तसेच मोठ्या संख्येने सभासद शेतकरी उपस्थित होते.

# गोल्ड अँण्ड सिल्वर सराफ असोसिएशन पिंपरी-चिंचवड आयोजित गलाई बांधवांचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न

**विटा/प्रतिनिधी:**



गोल्ड अँण्ड सिल्वर सराफ असोसिएशन, पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने गलाई बांधवांचा भव्य स्नेह मेळावा सोमवार दि.१५ सप्टेंबर रोजी पिंपरी चिंचवड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. शहरातील विविध भागातून आलेल्या सराफ व्यावसायिक, उद्योजक, समाजातील मान्यवर आणि युवा पिढीच्या उपस्थितीने हा कार्यक्रम ऐतिहासिक ठरला.

या कार्यक्रमाला आमदार सुहास अनिलभाऊ बाबर उपस्थित होते. त्यांनी गलाईकरांच्या परंपरेबरोबर आधुनिक व्यवसायात येणाऱ्या संधी, आव्हाने आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर यावर मार्गदर्शन केले. समाजातील ऐक्य परस्पर सहकार्य आणि नव्या पिढीला उद्योगधंद्याकडे प्रोत्साहन देण्यावर भर दिला.

आपल्या मनोगतात आमदार सुहास बाबर म्हणाले माझा मतदारसंघ हा केवळ एका भौगोलिक सीमेत मर्यादित नाही. गलाई बांधव देशभर विखुरलेले असून त्यांनी व्यापार, उद्योग आणि समाजकारण या सर्व क्षेत्रांत नाव कमावले आहे. माझ्या विधानसभेच्या निवडणुकीत गलाई बांधवांनी दिलेला पाठिंबा माझ्यासाठी अमूल्य आहे. आपली एकजुट, अथक परिश्रम आणि विश्वास नेहमीच माझ्या पाठीशी आहे. आज मी ज्या जबाबदारीच्या स्थानावर आहे, त्यात आपल्या योगदानाचा मोठा वाटा आहे.

मेळाव्यात उपस्थित गलाई बांधवांनी आमदार सुहास बाबर यांचे मनःपूर्वक स्वागत करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. गलाई बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच ठाम पावले उचलणाऱ्या आमदारांच्या पुढाकारामुळे समाजातील तरुणांना प्रेरणा मिळत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.